# C

# CCE PR
# NSR & NSPR

ಕರ್ನಾಟಕ ಪ್ರೌಢ ಶಿಕ್ಷಣ ಪರೀಕ್ಷಾ ಮಂಡಳಿ, ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು – 560 003

**KARNATAKA SECONDARY EDUCATION EXAMINATION BOARD, MALLESHWARAM, BANGALORE – 560 003**

**ಎಸ್.ಎಸ್.ಎಲ್.ಸಿ. ಪರೀಕ್ಷೆ, ಜೂನ್ / ಜುಲೈ, 2022**

**S.S.L.C. EXAMINATION, JUNE / JULY, 2022**

**ಮಾದರಿ ಉತ್ತರಗಳು**

**MODEL ANSWERS**

ದಿನಾಂಕ : 28. 06. 2022 ] **ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 08-M**

Date : 28. 06. 2022 ] **Code No. : 08-M**

## ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

## Subject : First Language — MARATHI

**(ಪುನರಾವರ್ತಿತ ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಎನ್.ಎಸ್.ಆರ್. & ಎನ್.ಎಸ್.ಪಿ.ಆರ್.)**

**( Private Repeater / NSR & NSPR )**

[ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 125

[ Max. Marks : 125

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| I. | **खालील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिले आहेत. त्यापैकी योग्य पर्यायो उत्तर निवडून उत्तरे लिहा :** 10 × 1 = 10 | |
| 1. | सप्तमी विभक्तीचे प्रत्यय हे आहेत —<br>(अ) ऊन, हून (ब) चा, ची, चे<br>(क) त, ई, आ (ड) स, ला, ते.<br>**उत्तर :** (क) त, ई, आ | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 2. | वाक्यातील क्रियापद कर्त्याच्या लिंग वचनानुसार बदलते तेव्हा हा प्रयाग होतो –<br>(अ) कर्मणी (ब) कर्तरी<br>(क) भावे (ड) नवीन कर्मणी.<br>**उत्तर :** (ब) कर्तरी | 1 |
| 3. | ''देवाची भक्ती करा की, फळ मिळालेच समजा'' या वाक्यात आलेला काळ<br>(अ) वर्तमान काळ (ब) भूतकाळ<br>(क) भविष्यकाळ (ड) रीती वर्तमानकाळ.<br>**उत्तर :** (क) भविष्यकाळ | 1 |
| 4. | 'वाईट वेळ आली की बुद्धीही तशी होते' या आशयाची म्हण –<br>(अ) विनाशकाले विपरित बुद्धी<br>(ब) सुंभ जळाला तरी पीळ जळत नाही<br>(क) शितावरून भाताची परीक्षा<br>(ड) गाढवाला गुळाची चव काय.<br>**उत्तर :** (अ) विनाशकाले विपरित बुद्धी | 1 |
| 5. | 'लंबोदर' हा शब्द या समासाचे उदाहरण आहे –<br>(अ) अव्ययीभाव (ब) तत्पुरुष<br>(क) द्वंद्व (ड) बहुव्रीही.<br>**उत्तर :** (ड) बहुव्रीही | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 6. | 'सासरी होणारा जाच' या शब्दसमुहासाठी खालीलपैकी योग्य शब्द आहे —<br>(अ) लेकुरवाळी (ब) माहेरवास<br>(क) सासुरवास (ड) यातायात.<br>**उत्तर :** (क) सासुरवास | 1 |
| 7. | 'मुलांनो' यातील 'नो' हा प्रत्यय या विभक्तीचा आहे —<br>(अ) संबोधन (ब) प्रथमा<br>(क) चतुर्थी (ड) षष्ठी.<br>**उत्तर :** (अ) संबोधन | 1 |
| 8. | 'सुनील खो-खो खेळतो' यातील प्रयोग कोणता ?<br>(अ) कर्तरी (ब) कर्मणी<br>(क) भावे (ड) समापन कर्मणी.<br>**उत्तर :** (अ) कर्तरी | 1 |
| 9. | 'नवरात्र' या समासाचे उदाहरण आहे —<br>(अ) मध्यम पदलोपी (ब) द्विगु<br>(क) वैकल्पिक द्वंद्व (ड) बहुव्रीही.<br>**उत्तर :** (ब) द्विगु | 1 |
| 10. | 'अचानक होणारा मोठा बदल' या साठी योग्य शब्द हा आहे —<br>(अ) उत्क्रांती (ब) क्रांती<br>(क) साधना (ड) चमत्कार.<br>**उत्तर :**(ब)क्रांती | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| II. | **पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा योग्य सबंध लिहा :** $5 \times 1 = 5$ | |
| 11. | कवीश्वर : स्वरसंधी : : मनोबल : ................<br>**उत्तर :** विसर्ग संधी | 1 |
| 12. | खेळतो : क्रियापद : : अबब ! : .............<br>**उत्तर :** केवलप्रयोगी अव्यय | 1 |
| 13. | माय : माता : : भार्या : .................<br>**उत्तर :** पत्नी, अर्धांगिनी, बायको. जाया | 1 |
| 14. | गोरा : काळा : : देशप्रेमी : .......................<br>**उत्तर :** देशद्रोही | 1 |
| 15. | भला जन्म हा : लावणी : : अनंतशक्ती परमेश्वरू : .......................<br>**उत्तर :** केसोबास | 1 |
| III. | **पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :** $8 \times 1 = 8$ | |
| 16. | सर्वांसाठी विषयव्यवस्था कोण करतो ?<br>**उत्तर :** परमेश्वर | 1 |
| 17. | अनंत काणेकरांनी लिहिलेले एकमेव नाटक कोणते ?<br>**उत्तर :** निशिकांताची नवरी | 1 |
| 18. | गणातात्याच्या मोठ्या मुलाचे नाव काय होते ?<br>**उत्तर :** सोपानराव | 1 |
| 19. | लोकसाहित्यात माहेरचा दूत या पक्षाला मानले आहे ?<br>**उत्तर :** कावळा | 1 |
| 20. | रुक्मिणीच्या गुरुचे नाव काय होते ?<br>**उत्तर :** सुदेव | 1 |
| 21. | कवी यशवंत यांचे पूर्ण नाव काय ?<br>**उत्तर :** यशंवत दिनकर पेंढारकर | 1 |
| 22. | पृथ्वीच्या प्रेमासाठी पहाटेच्या वेळी कोण उभा आहे ?<br>**उत्तर :** शुक्र | 1 |
| 23. | 'पाठ आणि पोट यांचा झाला टाळ' ही कविता कोणत्या काव्यसंग्रहातून घेण्यात आली आहे ?<br>**उत्तर :** ध्रुपद | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| IV. | **खालील प्रश्नांची उत्तरे सूचनेप्रमाणे लिहा :** 3 × 2 = 6 | |
| 24. | वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.<br>अ) भान हरपणे ब) मस्तक बधीर होणे.<br>**उत्तर :** अ) भान हरपणे - स्वतःला विसरणे । 1<br>ब) मस्तक बधीर होणे - डोके सुन्न होणे । 1<br>( वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग व्हावा अर्थाचा नव्हे ) | 2 |
| 25. | अलंकार ओळखून लक्षणे लिहा.<br>चाफा बोलेना, चाफा चालेना<br>चाफा खंत करी, काही केल्या फुलेना !<br>**उत्तर :** चेतनगुणोक्ती अलंकार 1<br>निसर्गातील निर्जीव वस्तु सजीव आहेत अशी कल्पना करून ती मनुष्याप्रमाणे वागतात वा कृतो करतात अशी कल्पना केलेली असते. 1 | 2 |
| 26. | गण पाडून वृत्त ओळखा.<br>आरक्त होय फुलुनी प्रणयी पलाश.<br>**उत्तर :** आरक्त \| होयफु \| लुनीप्र \| णयीप \| ला श<br>– – U \| – U U \| U – U \| U – U \| – –<br>त \| भ \| ज \| ज \| ग ग<br>वृत्त – वसंततिलका<br>अक्षरे – 14<br>गण – 8 व्या अक्षरावर<br>यती – त, भ, ज, ज, ग ग | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| V. | **खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा :** $12 \times 2 = 24$ | |
| 27. | 'अनंतशक्ती परमेश्वरू' या कथेचे तात्पर्य कोणते ?<br>**उत्तर :**<br>परमेश्वर ही शक्ती ज्याला जशी भासली त्यालाच तो परमेश्वर मानता. ज्ञानी मनुष्य मात्र असे मानतो की परमेश्वराची ही एक शक्ती आहे. पूर्ण परमेश्वर नाही. सर्व शक्तीनी युक्त तो परमेश्वर होय. | 2 |
| 28. | 'कोपऱ्यातील छत्री घेवू नका' असे दुकानदार लेखकांना का म्हणाला ?<br>**उत्तर :** त्या छत्रीची किंमत बारा रुपये आहे परंतु ती छत्री तुम्ही विकत घेतल्यास संबंध पाणी अंगावर येईल व तुम्ही भिजून जाल. | 2 |
| 29. | ''म्या तरी काय गुत्त घेतलय का ?'' ससंदर्भ स्पष्ट करा.<br>**उत्तर :** पाठाचे नाव — वाटणी<br>लेखक — रा. रं. बोराडे<br>स्पष्टीकरण — वाटणीच्या वेळी आत्याबाईला कोणाकडे ठेवायचे यावरून वाद निर्माण झाल्यानंतर थोरल्या सुनेने धाकट्या सुनेला म्हटले आहे. | 2 |
| 30. | गंगूबाईंनी आपल्या गुरुना कोणती गुरुदक्षिणा दिली ?<br>**उत्तर :** गंगुबाईंनी गुरुना राहण्यासाठी खोल्या दिल्या त्यांच्याकडे गाणं शिकल्या पण गुरुदक्षिणा घेतली नाही म्हणून आपली मुलगी कृष्णा हिला गाणे शिकवण्याची विनंती करून 50 रु० फी देऊ लागल्या. | 2 |
| 31. | संत ज्ञानेश्वर यांचा परिचय लिहा.<br>**उत्तर :** संत ज्ञानेश्वर, पूर्ण नाव ज्ञानेश्वर विठ्ठलपंत कुलकर्णी (1275 - 1296) मराठीतील सतकवी व तत्वज्ञ. मूळचे नाथ संप्रदायी. 18 व्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहिली. 21 व्या वर्षी आळंदीत समाधी. गुरु संत निवृत्तीनाथ ओवी ज्ञानेशाची प्रसिद्ध.<br>ग्रंथ — अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, अभंग. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 32. | कृष्णाला काय आवडणार नाही ?<br>**उत्तर :** मला वाचविण्यासाठी कृष्णा तू धाव घे. शिशुपालरूपी कोल्हा केव्हा धाड घालेल हे कळेना त्याने तुझ्यासारख्या सिंहाच्या मालकीच्या भागावर धाड घालून मला पळवून न्यावे हे तुला आवडणार नांही. | 2 |
| 33. | भुके जीव काय-काय करतील असे कवी म्हणतो ?<br>**उत्तर :** भुकेसाठी पोरे सैरावैरा धावतील. ती अन्नभक्त आहेत. ती एकमेकांना खायलाही मागे पाहणार नाहीत. त्यांना देवरक्तही वर्ज्य नाही. जर देवाने भूक शमविली नाही तर त्याच्या माथ्यावर घणही घालण्यास मागे पुढे पाहणार नाहीत. | 2 |
| 34. | ''ज्या अभ्यासक्रमाला 8 वर्षे लागतात तो मी 2 वर्षे 3 महिन्यात पूर्ण केला.'' ससंदर्भ स्पष्ट करा.<br>**उत्तर : संदर्भ :**<br>पाठ : विद्यार्थ्यांनो जागृत व्हा !<br>लेखक : डॉ. बाबासाहेब आंबेडकर.<br>**स्पष्टीकरण :** विद्यार्थ्यांना उद्देशून केलेल्या भाषणात आंबेडकरांनी आत्मविश्वासाच्या जोरावर कोणतीही गोष्ट साध्य होऊ सकते हे सांगताना स्वतःचे वरील उदाहरण दिले आहे. | 2 |
| 35. | अनंत काणेकर याचा परिचय तुमच्या शब्दात लिहा.<br>**उत्तर :** अनंत आत्माराम काणेकर ( 1905 - 1980 ) पुरोगामी विचार सरणीचे कवी व लेखक<br>**काव्यसंग्रह –** चांदरात व इतर कविता, कोळीगीते<br>**लघुनिबंध –** शिंपले आणि मोती, तुटलेले तारे, पिकली पाने.<br>**प्रवास वर्णने–** धुक्यातून लाल ताऱ्याकडे, आमची माती आमचे आकाश<br>**नाटके –** निशिकांताची नवरी<br>**कथासंग्रह –** जागत्या छाया, मोरपिसे, रुपेरी वाळू 1957 – औरंगाबाद सा. सं. अध्यक्ष पद भूषविले. चित्रा, आशा साप्ताहिकाचे संपादक होते. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 36. | तात्यांनी किती एकर जमीन कशी कमवली होती ?<br>**उत्तर :** तात्यांनी रात्रंदिवस राबून 27 एकर जमीन कमवून ठेवली होती. त्यातील निम्म्यापेक्षा जास्त त्यांनी स्वतः मिळवली होती. त्यासाठी कष्टांची तमा बाळगली नव्हती की हौसमौज केली नव्हती. | 2 |
| 37. | ''जातील कधी हे आई ? घरदार न यांना काही.'' संदर्भासहीत स्पष्टीकरण करा.<br>**उत्तर :** कवितेचे नाव : पाहुणे<br>कवी : केशवकुमार<br>**स्पष्टीकरण :** कवितेतील मुलाने आपल्या आईला हा प्रश्न विचारला आहे कारण हे पाहुणे घरात बरेच दिवस मुक्काम ठोकून होते. त्यांच्या घरातील वागण्याने सारेच त्यांना कंटाळले होते. | 2 |
| 38. | पृथ्वीला कशाचे भूषण वाटते ?<br>**उत्तर :** पृथ्वो सूर्याला म्हणते तुझी थोरवी महान आहे. मला ठाऊक आहे की मी तुझ्यासमोर एक धुलीकण आहे परंतु तुझ्या पायाची धूळ सुद्धा मला अलंकारासारखी आहे. ती मिरविणेसुद्धा मला भूषणावह वाटेल. | 2 |
| VI.<br><br>39. | **खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा :** $1 \times 3 = 3$<br>अ) वृक्षवल्ली आम्हा सोयरे<br>ब) एकमेका साह्य करू अवघे धरू सपंथ.<br>**उत्तर :** कल्पनाविस्तार ( उत्तराचे मुद्दे ) :<br>i) कल्पनेचा अर्थ सांगणे ( शब्दशः अर्थ ) 1<br>ii) उदाहरण व स्पष्टीकरण $1\frac{1}{2}$<br>iii) तात्पर्य $\frac{1}{2}$ | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| VII. | **खालील प्रश्नांची उत्तरे पाच-सहा वाक्यात लिहा :** $13 \times 3 = 39$ | |
| 40. | मानकर, आंजूरकर आणि मोरे सरदारांनी काय केले ?<br>**उत्तर :** खंडोजी मानकरांनी गुराखी बनून किल्ल्यातील लोकांची जनावरे चारवून आणायची व संध्याकाळी किल्ल्यात पोहोचविण्याचे काम पत्करले. आंजूरकर पंचकळशे सुतार यांनी किल्ल्यात जाऊन तेथील लोकांच्या घरी सुतारकाम केले.<br>दुल्लबाजी मोरे सरदार यांनी कासारपण पत्करून किल्ल्यातील बायकांच्या बांगड्या भरण्याचे काम केले. हे सारे काम किल्ल्यातील रहस्य जाणून घेण्यासाठी केले. | 3 |
| 41. | 'शील' या गुणाबद्दल आंबेडकर काय म्हणतात ?<br>**उत्तर :** विद्येबरोबर शील महत्त्वाचे आहे. त्याशिवाय विद्या फुकाची आहे. शील नसलेला इसम विद्येच्या शस्त्राने दुसऱ्याचा घात करील. चातुर्य, बुद्धी हिला शीलाची जोड मिळाली तर तो कोणाची फसवाफसवी करू शकणार नाही, म्हणून शिकलेल्यांना शीलाची गरज आहे. शीलाशिवाय शिकलेले लोक निपजू लागले तर समाजाचा, राष्ट्राचा नाश अटळ आहे. शीलाची किंमत शिक्षणापेक्षा अधिक आहे. | 3 |
| 42. | लेखकाच्या घरी काकुंचे आगमन कसे झाले ?<br>**उत्तर :** सकाळी आठ वाजता छकड्यातून काकुंच आगमन झाले. छकड्यात दोन ट्रंका आणि सतरंजीत बांधलेली वळकटी बैठकीवर बांधलेली होती. ट्रंकेवर लाकडी चौकटीत बसविलेला पाण्याचा खुजा आणि मधल्या वळकटीवर बाजाची पेटी आणि मागल्या ट्रंकेवर आजीबाई विराजमान झाल्या होत्या. त्यांनी पोपटाचा पिंजरा घट्ट धरून ठेवला होता. डाव्या बगलेत बोका होता. असे काकुंचे आगमन झाले. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 43. | चाफ्याच्या झाडाला लेखक 'बडी माँ' का म्हणतात ? त्याची गंमत कोणती ?<br>**उत्तर :** पांढऱ्या चाफ्याच्या झाडाची कुठलीही फांदी किंवा पान तोडलं की तिथून दुधासारखा पांढरा चीक निघतो म्हणून त्या झाडाला लेखक 'बडी माँ' म्हणतो. या झाडाची गंमत म्हणजे फूलं आली की पाने गायब आणि पाने येतात तेव्हा फुलांचा पत्ता नसतो तो पाना फुलांचा लपंडाव सुरू असतो. | 3 |
| 44. | गंगुबाईंना कोणकोणते पुरस्कार आणि उपाधींनी सन्मानित करण्यात आले ?<br>**उत्तर :** पद्मभूषण, पद्मविभूषण, तानसेन, केंद्रीय संगीत नाटक अकादमी, माणिकरत्न, कर्नाटक भूषण, गोदावरी पुरस्कार, सहा विद्यापीठांनी डॉक्टरेट दिली. संगीत सरस्वती, संगीत सम्राज्ञी, भारतीय कंठ उपाधी मिळाल्या. | 3 |
| 45. | 'ही बार-बार तलवार येईल का पुन्हा' म्हणजे काय ?<br>**उत्तर :** तलवार म्हणजे युद्धात वापरायचे पोलादी हत्यार होय. परंतु शाहीर रामजोशींनी कवितेत नरदेहाला तलवार असे संबोधले आहे. मनुष्य जन्म हा वरचेवर कोणाला मिळत नाही. त्यामुळे हा जन्म अवांतर गोष्टीच्या मागे धावून तू वाया घालवू नकोस असे ते म्हणतात. | 3 |
| 46. | पाहुणे कसे निगरगट्ट आहेत ते लिहा.<br>**उत्तर :** पाहुणे ओसरीवर खूप वेळ झोपतात. राजरोसपणे डबा उघडुनी लाडवावर हल्ला करतात आणि बाबांच्या पेटीतून विड्यांचे जुडगे पळवितात व खूप दिवस तळ ठोकून राहतात आणि घरात कसेही वावरतात. | 3 |
| 47. | समाजसेवक कोणते काम करतात असे कवी यशवंत म्हणतात ?<br>**उत्तर :** समाजसेवक नेहमी समाजाची व देशाची सेवा करतात. ते करत असताना स्वतःच्या स्वार्थाला मुरड घालतात, तिलांजली देतात. त्यावेळी ते कुटुंबाचा विचार करत नाहीत. लोकसेवा हेच त्यांचे ध्येय असते. संपूर्ण समाजच आपले कुटुंब आहे. या भावनेने ते कार्य करत असतात. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 48. | पृथ्वीचे प्रेम मिळावे यासाठी कोण-कोण कशी याचना करीत आहे ?<br>**उत्तर :** तारे नटूनथटून दिमाखात येतात. उल्कारूपी फुले टाकतात. सूर्याचे दिव्यकण गोळा करून चंद्र पृथ्वीला मोहविण्याचा प्रयत्न करतो. प्रभेचा पिसारा पसरून शुक्र व मंगळ लाजून प्रेमाची याचना करतात. त्याचप्रमाणे ध्रुव व धुमकेतूही आपल्या परीने प्रयत्न करतात. | 3 |
| 49. | धरण कवितेतील स्त्रीच्या गरीब परिस्थितीचे वर्णन कसे केले आहे ?<br>**उत्तर :** धरण कवितेतील स्त्री अतिशय गरीब आहे. कष्ट करूनही उपाशी राहणाऱ्या स्त्रियांचे प्रतिनिधित्व ती करते. पहाटे उठून दळण दळावे लागते. पुरेसे धान्य तिच्याकडे दळायला नाही. त्यामुळे कणीकोंड्याचा ती स्वयंपाक करते. मुलाला बुट्टीखाली ठेवून तिला उन्हात कष्ट करावे लागतात. पाय भाजू नये म्हणून ती पाला बांधून घेते. परंतु घोटभर पाण्यासाठी तिला वणवण भटकावे लागते. | 3 |
| 50. | लेखकाला पाकगृहाच्या दारात उभे राहिल्यावर कोणते दृश्य दिसले ?<br>**उत्तर :** काकुनी आपला बिछाना पसरला होता. समोर पेटी घेऊन त्या ती वाजविण्यात आणि भजन गायनात गर्क होवून गेल्या होत्या त्यांच्या खांद्यावर त्यांचा आवडता पोपट, विराजमान झाला होता आणि बोकोबा मालकिणीला खेटून पहुडले होते. | 3 |
| 51. | ज्ञानेश्वर कावळ्याला कोणकोणत्या गोष्टी देऊ करतात ?<br>**किंवा**<br>पैल तो गे काऊ कोकताहे कवितेचा थोडक्यात सारांश लिहा.<br>**उत्तर :** शकुन सांगण्यासाठी ज्ञानेश्वर कावळ्याला अनेक गोष्टी देवू करताहेत. सोन्याने पाय मढवीन, दही भाताची उंडी तोंडाला लावीन, वाटी भरून दूध देईन, पिकलेले रसाळ आंबे देईन.<br>**किंवा**<br>पैल तो गे काऊ कोकताहे ही ज्ञानेश्वरांनी लिहिलेली विरहिणी आहे. यामध्ये संत ज्ञानेश्वर कावळ्याला आपल्या घरी विठ्ठल ( पंढरीराया ) येण्याचा शकुन सांगावा यासाठी अनेक गोष्टी देवू करताहेत. सोन्याने पाय मढवीन, दही भाताची उंडी तोंडाला लावीन, वाटी भरून दूध देईन पिकलेले रसाळ आंबे देईन. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 52. | हिरव्या तृणपात्याचा सत्कार का व कसा करण्यात आला ?<br>**उत्तर :** प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत हिरवे तृणपाते उगवले आहे. कठीण परिस्थितीशी तोंड देत जन्माला आलेल्या हिरव्या तृणपात्याचा सत्कार करण्यात आला आहे. ते पाते मृत्युंजयी आहे. जीवनाचा साक्षात्कार आहे म्हणून त्याचा सत्कार करण्यात आला.<br>यासाठी पक्षांनी स्वागतगीत म्हटले, ढगांनी लवून मजरा केला. वाऱ्याने लाल मातीचा गुलाल उधळला. दक्षिणोत्तर सर कोसळली. सर्व दिशांतून अभीष्टचिंतन झाले. | 3 |
| VIII. | **खालील प्रश्नांची आठ-दहा वाक्यात उत्तरे लिहा :** 4 × 4 = 16 | |
| 53. | मदर्स युनियन या संस्थेची माहिती लिहा.<br>**किंवा**<br>हाऊस वाइव्हज या संस्थेची माहिती लिहा.<br>**उत्तर :** तीन मजली इमारत. पहिला मजला मदर्स युनियनचे ऑफिस, दुसरा मजला पालक संस्था, तिसरा मजला शिक्षक संघ ऑफिस, अनाथ व पोरक्या मुलांना आधार देण्याचे कार्य. अध्यक्षा खूप वयस्कर पण उत्साही. ही संस्था मातांची मार्गदर्शक आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर या मदर्स युनियन संस्थेची स्थापना झाली आहे.<br>**किंवा**<br>हाऊस वाइव्हज स्थापना 1948. खूण लाकडाचा मोठा हात. राष्ट्राच्या रक्षणासाठी खंबीरपणे पुढे आलेला हात. गृहिणींनी वर्गणीतून सहा मजली इमारत बांधली. पुष्परचना, हस्तव्यवसाय, आहारशास्त्र, गृहरचना, स्वयंपाकाचे वर्ग येथे चालतात. जीवनमान सुधारणे, बाजारहाट करणे, नकली मालापासून सावधान, बजेट तयार करण्याचे मार्गदर्शन तज्ज्ञांकडून केले जाते. 207 शाखा आहेत. भेसळ करणाऱ्यांवर बहिष्कार टाकला जातो. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 54. | पतीच्या मृत्युनंतर टिटवं घेऊन जाताना सावित्रीबाईंना कोणत्या गोष्टी आठवत होत्या ?<br>**किंवा**<br>सावित्रीबाई शिक्षिका म्हणून शाळेत जाऊ लागल्यावर लोकांनी कोणत्या प्रतिक्रिया दर्शविल्या ?<br>**उत्तर :** टिटवं घेऊन जाताना एकेक हुंदक्याबरोबर एकेक आठवणी आठवत होत्या. लग्न, त्यांचे शिकवणं, शाळा, काशीचा पोरगा, यशवंता, पिण्याच्या पाण्याचा हौद, गुलामगिरी पुस्तक, शूद्रांच बोर्डिंग, बालहत्या प्रतिबंधक गृह, मृत्युपत्र, सत्यशोधक समाज अन ऊर भरून आला व म्हणाला, ''तू बी असंच काम करत मृत्युला सामोरे जा !''<br>**किंवा**<br>खिडकीसमोर माणसं उभी राहायची आणि घाण शिव्या द्यायची. ओरडायची माजले हे शूद्र म्हणायचे. शाळेला जाताना सावित्रीबाईंना छेडायचे. कुणी बाजुने जायचा आणि थुंकायचा, कुणी समोरून आडवा यायचा आणि खाकरायचा, त्यामुळे जीव घाबरा-घुबरा व्हायचा. एक दिवस चार जणांनी रस्त्यात अडवलं होत. | 4 |
| 55. | भारत कशाप्रकारे असावा अशी संत तुकडोजींनी अपेक्षा केली आहे ?<br>**उत्तर :** या देशातील सर्व पंथ संप्रदाय यांच्यातील हेवेदावे नष्ट होऊन, बंधुभाव निर्माण झाला पाहिजे असे कवीला वाटते. या देशातील गरीब-श्रीमंत, हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन गुण्यागोविंदाने नांदले पाहिजेत. सर्वांना स्वातंत्र्य, सुख उपभोगता आलं पाहिजे. सर्वांना मानवता, राष्ट्रभावना कळली पाहिजे. या देशातील अस्पृश्यता नष्ट व्हावी व प्रत्येकाच्या घरी स्वर्गासारखे सौंदर्य नांदावे. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 56. | पुढील कवितेच्या ओळी पूर्ण करा :<br>पहिल्या हिरव्या तृणपात्याचा .............<br>...............................................<br>...................................... दारूण<br>...............................................<br>...............................................<br>............................ धरणीच्या पोटी.<br>**किंवा**<br>या इवल्या बीजाच्या .....................<br>..............................................<br>.......................................सत्कार<br>..............................................<br>..............................................<br>.......................अवचित हो सत्कार.<br>**उत्तर :**<br>पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार<br>उरि जेव्हा ज्वालारस झेलून<br>धरतीने तप केले दारुण<br>सुकता सुकता नद्या म्हणाल्या हाच विश्वसंहार<br>पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार<br>त्याकाळी धरणीच्या पोटी.<br>**किंवा**<br>या इवल्या बीजाच्या ओठी<br>थरथरली स्फुरली होती हो श्रद्धेची ललकार<br>पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार<br>कवच भूमीचे आणि अचानक<br>भेदुनि आले हिरवे कौतुक<br>नचिकेताचे स्वप्नच अथवा अवचित हो सत्कार. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| IX. | **खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा :** $2 \times 2 = 4$ | |
| 57. | नुसती स्वप्ने पहात बसणे जसे वाईट आहे. तशीच आपल्या ध्येयाबद्दल एकसारखी चर्चा करणे ही वाईट असते. माझी अशी महत्त्वाकांक्षा आहे, तशी महत्त्वाकांक्षा आहे. त्यासाठी मी असा प्रयत्न करणार आहे. तशी मी योजना आखली आहे. असे ज्याला त्याला सांगत सुटण्याची सवय काही लोकांना असते. त्यामुळे त्याची शक्ती नुसती चर्चा करण्यात अधिक खर्च होते आणि प्रत्यक्ष ध्येयानुकूल कृती त्यांच्या हातून काहीच घडत नाही. बोलेल तो करील काय आणि गर्जेल तो वर्षेल काय ही म्हण प्रसिद्धच आहे.<br>जो अल्पस्वल्प प्रगतीत इतिकतव्यता मानतो तो काही खरा महत्त्वाकांक्षी नव्हे. आळस, अज्ञान, भीती, शारीरिक दुर्बलता, मानसिक चंचलता या गोष्टींच्या आहारी जाऊन अनेक माणसे म्हणतात, जाऊ द्या माणसाने समाधानी वृत्तीने रहावे.<br>**प्रश्न :**<br>अ) कोणत्या गोष्टी वाईट आहेत ?<br>ब) कोण खरा महत्त्वाकांक्षी नव्हे ?<br>**उत्तर :** अ) नुसती स्वप्ने पहात बसणे तशीच आपल्या ध्येयाबद्दल एकसारखी चर्चा करणे वाईट असते. 2<br>ब) जो अल्पस्वल्प प्रगतीत इतिकर्तव्यता मानतो तो खरा महत्त्वाकांक्षी नव्हे. 2 | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| X. | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा :** $1 \times 5 = 5$ | |
| 58. | सांसर्गिक रोग वाढत चालल्यामुळे तुमच्या भावाला तब्येतीची काळजी घेण्यास सांगणारे पत्र लिहा.<br>**किंवा**<br>बहिणीच्या लग्नानिमित्त चार दिवस शाळेला येऊ शकणार नाही असा अर्ज वर्ग शिक्षकांना लिहा.<br>**उत्तर : पत्र :**<br>i) प्रेषक पत्ता ( पाठवणाऱ्याचा पत्ता, तारखेसह ) 1<br>ii) मायना 1<br>iii) विषय मांडणी व भाषा सजावट 2<br>iv) समारोप व सही $\frac{1}{2}$<br>v) कोणाला पत्र पाठवायचे त्याचा पत्ता. $\frac{1}{2}$ | 5 |
| | **किंवा**<br>**अर्ज :**<br>i) प्रेषक पत्ता ( पाठवणाऱ्याचा पत्ता, तारखेसह ) 1<br>ii) मायना 1<br>iii) विषय मांडणी 1<br>iv) मजकूर 1<br>v) सही व पत्ता ( कोणाला अर्ज पाठवायचा ) 1 | 5 |
| XI. | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंधलेखन करा :** $1 \times 5 = 5$ | |
| 59. | मोबाईल शाप की वरदान<br>**किंवा**<br>ग्रंथ हेच गुरु.<br>**उत्तर :** निबंधलेखनाचे मुद्दे :<br>i) आकर्षक प्रारंभ 1<br>ii) विषय ज्ञान 2<br>iii) भाषा सौंदर्य 1<br>iv) शेवट. 1 | 5 |